Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,
Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, FEB-MAR, 2021, VOL-9/44

# शिक्षक व्यावसायिक नैतिकता अभ्यास

प्रा. प्रकाश जगताप, Ph.D.

टिळक शिक्षण महाविधालय ,पुणे

**Paper Received On:** 25 MAR 2021
**Peer Reviewed On:** 30 MAR 2021
**Published On:** 1 APRIL 2021

***Abstract***

शिक्षक हे प्रत्येक देशाचे महत्त्वाचे संसाधन आहे.देशाच्या विकासात शिक्षकाचा मोठा वाट असतो.म्हणून शिक्षक क्षमता युक्त ,व नैतिकतेचे पालन करणारा असणे आवश्यक गरजेचे आहे. शिक्षक व्यवसायिक नैतिकता म्हणजे एन सी टी ई ने शिक्षकांची विद्यार्थी, पालक व समाज, व्यवसाय व सहकार्याबद्दलसांगितलेली कर्तव्य होय. प्रस्तुत संशोधनात शिक्षकाच्या व्यावसायिक नैतिकता अभ्यास केला आहे.

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:-**

शिक्षक हा देशाचा कणा असतो, जणू आधारस्तंभच.. या आधारस्तंभावरच सगळ्या आशा आकांक्षा वास्तवात रूपांतरित होतात. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणातून आजचे आधुनिक चिकित्सक, नव्या ध्येयांनी भरलेली, नवीन मूल्यांचा अंगीकार करणारी पिढी घडविण्याचे कार्य शिक्षकांमार्फत घडवायचे आहे. समाजाचे संस्कृती संरक्षण, विकासाच्या कार्यामध्ये शिक्षकांची मोठी जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांचे नैतिक वर्तन, त्यांच्या आंतरिक शक्तींचा विकास, त्यांची मूल्ये घडवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी शिक्षकांवर आलेली आहे. शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटक आहे. एकविसाव्या शतकात वैज्ञानिक व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ज्ञान संपादनाचे मार्ग आजच्या विद्यार्थ्याला

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

उपलब्ध आहेत. तरीही शिक्षण प्रक्रियेतील तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील शिक्षकांची भूमिका व महत्व कमी होत नाही आणि म्हणूनच आजचा शिक्षक हा काळानुरूप सक्षम, सर्व क्षमतांनी परिपूर्ण व नैतिकतेचे पालन करणारा असणे आवश्यक आहे.

शिक्षकांचे व्यक्तिमत्व जेवढे प्रभावी, ज्ञानसंपन्न, नीती तत्वाला अनुसरून असेल तेवढे ते विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असते. एकविसाव्या शतकातील आव्हाने व भविष्यातील समस्यांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे हे शिक्षकांनी आपले प्रमुख क्रार्य समजले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या वर्गातील अनुभवांची सामाजिक संघटना त्याच्या परिणामांसाठी महत्त्वाची असते आणि ती शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी वर अवलंबून असते. ही बांधिलकी शिक्षकांच्या श्रद्धा व व्यवसायिक नीतिमत्तेद्वारे अधोरेखित केली जाते.

**संशोधनाची गरज:-**

शिक्षण क्षेत्रात उत्तम नैतिकतेचा सराव करणे प्रामुख्याने शिक्षकाकडून अपेक्षित असते पालक, विद्यार्थी, समाज इत्यादींशी वागताना शिक्षक विविध समस्या हाताळतात. शिक्षकांचे गैरवर्तन किंवा अनैतिक कृत्य समाजात मोठे वादळ निर्माण करतात. आणि अनेकांवर विपरीत परिणाम होतो यासाठी शिक्षकांद्वारे योग्य आणि मोठ्या प्रमाणात आदर्श वर्तन आवश्यक आहे. शिक्षकांचे आदर्श वर्तन नेहमीच विद्यार्थ्यांच्या आचरणाला आकार देण्यास प्रेरक व मार्गदर्शक असते. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी शैक्षणिक संस्थेमध्ये आचरणात आणलेली व्यवसायिक नैतिकता ही शिक्षण प्रक्रियेत जोपासली जाणारी मूल्य प्रतिबिंबित करते. आणि म्हणूनच संशोधकास शिक्षक व्यवसायिक नैतिकता विकसित करण्याची गरज वाटते.

सामाजिक विकासासाठी आणि स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी तसेच जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून सर्वव्यापी गुणवत्ता सुधारण्याची गरज निर्माण झाल्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मागणी होत आहे. सध्याच्या काळात केवळ स्वःविकासापेक्षा वेगळा विचार करून पुढे जावे लागेल. जागतिक विचार, जागतिक स्पर्धा,

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

उद्दिष्टे तसेच वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विकास यासारख्या शिक्षणाच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचणे काळाची गरज आहे. अशा बदलत्या समाजात बदलत्या शिक्षण व्यवस्थेतील शिक्षक या बदलाचे प्रमुख घटक असतात. अशा शिक्षकांच्या व्यवसायिक नैतिकतेचा विकास त्यांच्या दैनंदिन व्यवहारावर परिणाम करत असतो. हे लक्षात घेऊन प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाची गरज वाटते.

प्रस्तुत संशोधन अभ्यासात शिक्षकांसाठी व्यवसायिक नैतिकता कार्यक्रम विकसित करून त्याची परिणामकारकता तपासण्या वर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. एकीकडे दर्जेदार शिक्षणावर वाढता भार आणि दुसरीकडे व्यवसायिक आणि नैतिक मूल्यांचा ह्रास यासंदर्भात शिक्षकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी केवळ कार्यक्रम विकसित करून त्याची परिणामकारकता अभ्यास केली जाऊ शकते. संबंधित साहित्याच्या अभ्यासातून असे आढळून आले की, शिक्षक व्यवसायिकतेच्या संदर्भात विविध पैलूंचा अभ्यास करून संशोधन झाले आहे. जागतिक अर्थव्यवस्था ही ज्ञानावर आधारित आहे म्हणूनच शिक्षण है आर्थिक विकासाचे प्रमुख साधन बनत आहे. शिक्षण प्रणाली जसजशी बदलत आहे तसतसे शिक्षणाच्या गुणवत्तेबद्दल समाजाची चिंता वाढत आहे. म्हणूनच जागतिकीकरण, आंतरराष्ट्रीयकरण, खाजगीकरण आणि तांत्रिक प्रगती यांनी शिक्षणाला सर्वोच्च स्थान दिले असल्याने शिक्षकांच्या व्यवसायिक नैतिकतेचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे.

**संशोधनाचे महत्त्व:-**

शैक्षणिक क्षेत्रात शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण नैतिक आदर्शासाठी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये व्यवसायिक जबाबदाऱ्या आणि कर्तव्य यांच्याशी संबंधित संवेदनशीलता, विकसित केलेल्या भावना जीवनाच्या इतर क्षेत्रांमध्ये हस्तांतरित केल्या जातात. जिथे लोक व्यवसायिक कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्यात गुंतलेले असतात.

व्यवसायिक नैतिकतेच्या तत्त्वांचे प्रामाणिकपणे आणि गांभीर्याने पालन केल्याने शिक्षक व्यवसायिक म्हणून त्याच्या वाढीस न्याय देऊ शकतात. व्यवसायिक नैतिकतेच्या तत्त्वांनी

प्रेरित होऊन ते त्यांच्या शिकण्याच्या आणि शिकविण्याच्या विषयांच्या संपर्कात राहतात. त्यांना जो विषय शिकवायचा आहे त्यासंबंधीच्या नवीन घडामोडी समजून घेतात आणि आत्मसात करतात, आणि त्यांच्या सूचनांचे तंत्र सुधारतात. शिक्षक आपापसात आणि त्यांच्या विद्यार्थ्यांशी तसेच समाजाशी ही चांगले संबंध ठेवतात हे लक्षात घेता प्रस्तुत संशोधन विषय अभ्यासने महत्त्वाचे वाटते.

शिक्षणातील व्यवसायिक नैतिकतेच्या महत्त्वाच्या संदर्भात प्रख्यात विचारवंत आणि महान शैक्षणिक तज्ञांनी दिलेल्या काही प्रेरणादायी संदर्भाचा विचार करणे योग्य आहे...

ड्युई (1910) यांचे निरीक्षण आहे, 'शिक्षक हा मार्गदर्शक आणि दिशादर्शक असतो. तो बोट चालवितो पण त्याला चालना देणारी ऊर्जा जे शिकत आहेत त्यांच्याकडून आली पाहिजे. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या भूतकाळातील अनुभव, त्यांच्या आशा आकांक्षा, आवड यांची जितकी जास्त जाणीव असेल तितके त्याला कामातील शक्ती अधिक चांगल्या प्रकारे समजेल.' दुसरीकडे गांधीजींनी (1927) टिपणी करतात, 'खाया शिक्षकांनी विद्यार्थ्याच्या हृदयाला स्पर्श केला पाहिजे. त्याचे सुख-दुःख सामायिक केले पाहिजे. त्यांना मार्गदर्शनाने योग्य मार्गावर घेऊन जाणे आवश्यक आहे.' वैविध्यपूर्ण दृष्टिकोण निवडण्यासंदर्भात डॉ. कलाम (2004) म्हणतात, 'शिक्षकांचे उद्दिष्ट मूल्यांवर आधारित समाज आणि अज्ञानापासून मुक्त नागरिकत्व निर्माण करणे हे असले पाहिजे. जर एखाद्याला चांगले शिक्षक व्हायचे असेल तर त्याला नैतिक मूल्यांची जाण असणे आवश्यक आहे. पण केवळ अशा प्रकारची भावना बाळगणे पुरेसे नाही व्यक्तीने ती भूमिका अगदी प्रामाणिकपणे निभावली पाहिजे.'

**समस्या विधान :-**

माध्यमिक शालेयस्तरावरील शिक्षक व्यवसायिक नैतिकता अभ्यास करणे .

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**कार्यात्मक व्याख्या :-**

**माध्यमिक शालेयस्तर** :- असा स्तर जेथे इयत्ता नववी व दहावीचे अध्ययन- अध्यापन कार्य केले जाते.

**शिक्षक** :- शिक्षक म्हणजे अशी व्यक्ती आहे, जी विद्यार्थ्यांना ज्ञान, क्षमता आणि नैतिक मूल्य प्राप्त करण्यास मदत करते.

**नैतिकता**:- नैतिकता म्हणजे शिक्षकांचे विद्यार्थी, पालक व समाज, व्यवसाय व सहकाऱ्यांबरोबरचे योग्य वर्तन होय.

**शिक्षक व्यावसायिक नैतिकता :-** शिक्षक व्यवसायिक नैतिकता म्हणजे एन सी टी ई ने शिक्षकांची विद्यार्थी, पालक व समाज, व्यवसाय व सहकार्याबद्दल सांगितलेली कर्तव्य होय. शिक्षक व्यवसायिक नैतिकता शलाकेच्या अंमलबजावणीतून प्राप्त झालेले प्राप्तांक होय.

संशोधनाची उद्दिष्टे :-

2. शिक्षकांच्या व्यवसायिक नैतिकतेच्या सद्यस्थितीचा शोध घेणे.

3. शिक्षकांच्या व्यवसायिक नैतिकतेचे खालील घटकां प्रमाणे तुलना करणे.

(a) **ग्रामीण व शहरी भागातील** शिक्षक

(b) कमी अनुभव व जास्त अनुभव,

शून्य परिकल्पना :-

1. **ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक शिक्षकांच्या** शिक्षक व्यावसायिक नैतिकता शलाकेच्या **मध्यमानामध्ये कोणताही सार्थ फरक आढळत नाही.**

2. कमी अनुभव व जास्त अनुभव असणाऱ्या माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या व्यावसायिक नैतिकता शलाकेच्या प्राप्ताकांच्या मध्यमानात कोणताही सार्थ फरक आढळणार नाही.

**जनसंख्या व न्यादर्श :-**

जनसंख्या :- पुणे जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील अध्यापन करणारे शिक्षक हि जनसंख्या आहे .

**न्यादर्श निवड :-**

सदर संशोधनासाठी ६१ शिक्षकांची निवड असंभाव्यतेवर आधारित प्रासंगिक नमुना निवड पद्धतीने करण्यात आली .

**माहिती संकलनाची साधने :-**

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलनासाठी संशोधकाने Dr. Baldwin B.Sumer, prof. Ibadani Syiem यांची Teacher professional ethics scale चा वापर केला आहे.

**संख्याशास्त्रीय साधने :-**

प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीच्या विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, t-परिक्षिकेचा वापर करणार आहे.

संशोधनाची व्याप्ती, मर्यादा:-

1. प्रस्तुत संशोधन पुणे जिल्हयातील माध्यमिक स्तरावरील शिक्षकांशी संबंधित आहे.
2. प्रस्तुत संशोधन शिक्षक व्यवसायिक नैतिकतेच्या विद्यार्थी, पालक व समाज, व्यवसाय व सहकारी या घटकांशी संबंधित असेल.

संशोधनाची मर्यादा :-

1. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष प्रतिसाधकांनी शिक्षक व्यवसायिक नैतिकता शलाकेत भरून दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून असतील.

माहितीचे विश्लेषण –

**शून्य परिकल्पना – ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक शिक्षकांच्या शिक्षक** व्यावसायिक नैतिकता शलाकेच्या **मध्यमानामध्ये कोणताही सार्थ फरक आढळत नाही.**

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

प्रस्तुत शून्य परिकल्पना तपासण्यासाठी ग्रामीण व शहरी भागातील शिक्षकांना मिळालेल्या शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता शलाकेच्या प्राप्तांकांचे मध्यमान, प्रमाणविचलन काढण्यात आले. तसेच टी परीक्षिकेच्या मदतीने दोन्ही मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्यात आली.

| शिक्षक | नमुना संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मूल्य | शून्य परिकल्पना |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण भागातील शिक्षक | २७ | २७९.३५ | २८.९९ | १.३९ | स्वीकार |
| शहरी भागातील शिक्षक | ३४ | २९६.३९ | ३१.४४ | | |

*कोष्टकातील टी मूल्य - ०.०५ सार्थकता स्तर - १.९८ (स्वाधीनता मात्रा १००)

कोष्टक वरून असे दिसून येते की, ग्रामीण भागातील शिक्षक व शहरी भागातील शिक्षकांच्या शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता शलाकेच्या` मिळालेल्या प्राप्तांकाची तुलना केली असता, येणारे टी मूल्य १.३९ इतके आहे. ०.०५ या सार्थकता स्तरावर कोष्टक टी मूल्य १.९८ इतके आहे. गणन केलेले टी मूल्य हे कोष्टक टी मूल्यापेक्षा जास्त असल्याने शून्य परिकल्पना चा त्याग करण्यात आला. म्हणजेच ग्रामीण भागातील शिक्षक व शहरी भागातील शिक्षकांच्या शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता च्या मध्ये सार्थ फरक दिसून येतो. यावरून शहरी भागातील शिक्षकांची शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता ग्रामीण भागातील शिक्षकांच्या शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता पेक्षा अधिक आहे.

शून्य परिकल्पना – शिक्षक व शिक्षिकांच्या शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता शलाकेच्या प्राप्तांकाच्या मध्यमानामध्ये कोणताही सार्थ फरक आढळत नाही. प्रस्तुत शून्य

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

परिकल्पना तपासण्यासाठी शिक्षक आणि शिक्षिकांना शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता शलाकेच्या शलाकेमध्ये मिळालेल्या प्राप्तांकांचे मध्यमान, प्रमाणविचलन काढण्यात आले. तसेच टी परीक्षिकेच्या मदतीने दोन्ही मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्यात आली.

| नमुना | नमुना संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | टी मूल्य (गणन केलेले) | शून्य परिकल्पना स्वीकार/त्याग |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षक | २६ | २.६६.०७ | २८.१६ | ०.३४ | स्वीकार |
| शिक्षिका | ३५ | २८७.१९ | ३१.१९ | | |

*कोष्टकातील टी मूल्य - ०.०५ सार्थकता स्तर - १.९८ (स्वाधीनता मात्रा १००)

कोष्टक वरून असे दिसून येते की, शिक्षक आणि शिक्षिका यांना शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता शलाकेच्या मिळालेल्या प्राप्तांकाची तुलना केली असता, येणारे टी मूल्य ०.३४ इतके आहे. ०.०५ या सार्थकता स्तरावर कोष्टक टी मूल्य १.९८ इतके आहे. गणन केलेले टी मूल्य हे कोष्टक टी मूल्यापेक्षा कमी असल्याने शून्य परिकल्पना चा स्वीकार करण्यात आला. म्हणजेच शिक्षक शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता मध्ये सार्थ फरक नाही. यावरून शिक्षक आणि शिक्षिकांची शिक्षक शिक्षक व्यावसायिक नैतिकता सारखीच आहे.

निष्कर्ष –

पुणे जिल्हयातील शिक्षकांची शिक्षक व्यावसायिक नैतिकता चांगली आहे

पुणे जिल्ह्यातील शहरी भागातील शिक्षक व्यावसायिक नैतिकता चांगली आहे.

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिक्षकांची शिक्षक व्यावसायिक नैतिकता चांगली आहे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी शाळेतील शिक्षकांची व कमी अनुभव व जास्त अनुभव असलेल्या शिक्षकांची शिक्षक व्यावसायिक नैतिकते च्या मध्ये लक्षणीय फरक नाही.

## संदर्भ

घोरमोडे के यु घोरमोडे क *(२००९)* शिक्षकांचे शिक्षण, नागपूर, विदया प्रकाशन

*मूळे रा., उमाठे वि. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर,महाराष्ट विदयापीठ ग्रंथ निर्मिती*

*पंडित बी., पाटील ना., मोरे ल. (२००९) शिक्षक शिक्षण, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स,*

*पंडित ब.,सपकाळे आ.,मोरा ल., (२००६) भारतातील शिक्षण व्यवस्थेचा विकास, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स,*

*पवार ना., (२००७) भारतातील शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह,पुणे, नित्यनूतन प्रकाशन*

*पारसनिस न., (२००९) शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका,पुणे, नित्यनूतन प्रकाशन,*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*